महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**महत्त्वाचे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी(१९-२०)/पुवि/२०१९/४०९८
दिनांक :- 11 JUN 2019

प्रति,

प्राचार्य,मुख्याध्यापक
सर्व झोन प्रमुख
झोन सहाय्यक/ पर्यवेक्षिय अधिकारी,
झोन निहाय संपर्क प्रमुख, (पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र)

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० माहिती पुस्तिकेच्या विक्रीची रक्कम बँक खात्यात भरणेबाबत**

संदर्भ:- **१) शासन निर्णय क्र-प्रवेश-२०१६/(१८०/१६)/एसडी-२,दि.०७.०१.२०१७.**
**२) शासन निर्णय क्र-प्रवेश-२०१९/प्र.क्र.३३३/एसडी-२,दि.०७.०३.२०१९.**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० चे कामकाज **पुणे व पिंपरी चिंचवड, या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ व ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.** इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश सन २०१९-२० साठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माहिती पुस्तिका वाटपाचे कामकाज दि.२५.०५.२०१९ रोजी सुरु झालेले आहे.

सदर माहिती पुस्तिका विक्री झाल्यानंतर ,चलनासह एकत्रिक अहवाल झोन प्रमुखांनी श्री. टकले,जी.व्ही (साधना विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर, पुणे) यांचेकडे सादर करावा. तसेच श्री. टकले यांनी सर्व झोननिहाय एकत्रित हिशोब या कार्यालयास श्री. आर जी जाधव यांचेकडे सादर यापुर्वी करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० ची माहिती पुस्तिका विक्री झालेल्या रक्कमेतुन १२०/- (एकशे वीस रुपये प्रत्येक पुस्तिकाची रक्कम **इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती , शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे नांवे असलेले बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे-४११ ००४. या बँक खाते क्र-६०१६५३०६१८२** या खात्यावर आज अखेर विक्री झालेली पुस्तिकेची सर्व रक्कम जमा करण्यात यावी. व त्याची चलनाची प्रत झोनप्रमुखांकडे सादर करावी.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे
प्रत :- श्री. टकले,जी.व्ही (साधना विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर, पुणे